जा.क्र.पोसआ/ ४३८४ /२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- ९ /०५/२०१९

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.

आदेश,

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला असून, १७ व्या लोकसभा निवडणुकीचे मतदान दिनांक २३/०४/२०१९ आणि दिनांक २९/०४/२०१९ रोजी शांततेत पार पडले आहे. दिनांक २३/०५/२०१९ रोजी मतमोजणी होणार आहे. सदर निवडणूक प्रक्रिया ही सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व उपद्रव टाळण्यासाठी सर्व प्रकारची शस्त्रे व हत्यारे यांना जवळ बाळगून फिरणेस मनाई करणे अत्यंत जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, संपूर्ण पुणे शहरात दिनांक १४/०५/२०१९ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३१/०५/२०१९ चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण निवडणुक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

नमूद मुदतीत अधिकृत हत्यार परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करण्यात येत आहे. सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल, संरक्षण दल, तुरुंग विभाग, बॅक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना) लागू राहणार नाही. ज्या परवाना धारकास रुढीप्रमाणे बंदुक डिस्प्ले करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.

सदर आदेशांचा उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी ०९/०५/२०१९ रोजी दिला आहे.

सेनगावकर ९/५/१९

ठिकाण :- पुणे शहर.
दिनांक :- ०९/०५/२०१९.

(रविंद्र सेनगावकर)
अपर पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर.
अतिरिक्त कार्यभार पोलीस सह आयुक्त,पुणे शहर.

पोलीस सहआयुक्त
पुणे शहर

जा.क्र.पोसआ/ ४३५ /२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- ९/०५/२०१९

विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ प्रमाणे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे आणि सदर निवडणुकीचे मतदान पुणे, बारामती लोकसभा मतदार संघात दिनांक २३/०४/२०१९ रोजी व शिरुर लोकसभा मतदार संघात दिनांक २९/०४/२०१९ रोजी शांततेत पार पडले असून, मतमोजणी ही दिनांक २३/०५/२०१९ रोजी होणार आहे.

आणि ज्याअर्थी, सदरची निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पाडणे साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून मी रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१)कोणत्याही कारणासाठी सार्वजनिक सभा / सभेचे ठिकाण व वेळ याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

२)कोणत्याही प्रकारच्या मिरवणूका काढण्याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३)ध्वनीक्षेपकाचा वापर कोणत्याही प्रकारे रात्रौ २२.०० ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत करू नये.

४)फिरत्या वाहनावरुन ध्वनीक्षेपकाचा वापर करू नये.

५)ध्वनीक्षेपकाचा परवाना जवळ बाळगावा.

६)ध्वनीक्षेपकाचा वापर वाहन थांबवूनच करावा.

७)ध्वनीक्षेपकाच्या आवाजाच्या तिव्रतेवर घालून दिलेल्या मर्यादेची काटेकोरपणे पालन करावे.

८)शाळा, कॉलेज, रूग्णालय या ठिकाणी थांबून ध्वनीक्षेपकाचा वापर करू नये.

९)निवडणूकीचे कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने एकावेळी कोणत्याही परिस्थितीत १० पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत. तसेच दोन ताफ्यातील अंतर हे २०० मीटर/ १५ मिनीटांचे असावे.

१०)सदरचा आदेश संरक्षण वाहनांच्या ताफ्यासह, केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री किंवा उच्च पदस्थ व्यक्ती घेवून जात असेल तेव्हा त्यांच्या सुरक्षितते विषयी लागू असलेल्या आदेशास अधिन राहून अंमलात राहील तसेच सदरचा आदेश शासकिय कामावर असलेल्या वाहनाच्या संदर्भात लागू राहणार नाही.

११) रस्त्यावरून जाणाऱ्या जमावाचे अगर मिरवणुकीत व्यक्तीचे वागणे अगर कृत्याबाबत पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने आदेश देणे.

१२)ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने निश्चित करणे.

१३)सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या लाऊड स्पिकरच्या ध्वनीची तिव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने नियंत्रण करणे.

१४) मिरवणुकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ याबाबत पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने नियंत्रण करणे.

हा आदेश संपूर्ण पुणे पोलीस आयुक्तलयाचे हद्दीत दिनांक १४/०५/२०१९ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३१/०५/२०१९ चे २४.०० वा. पर्यंत लागू राहील. सदरचा आदेश भंग करणारी अथवा व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश माझे सही शिक्कयानिशी आज दिनांक ०९/०५/२०१९ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- ०९/०५/२०१९.

पोलीस सहआयुक्त
पुणे शहर

(रविंद्र सेनगावकर) ९/५/१९
अपर पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर.
अतिरिक्त कार्यभार पोलीस सह आयुक्त,पुणे शहर.